**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.०५)**

**बुधवार दिनांक २६ ऑगस्ट २०२६**

**ठळक बातम्या**

1. **पंतप्रधान नरेंद्र मोदी उद्या राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त 'खेलो इंडिया डायलॉगला' दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून संबोधित करणार.**
2. **औषध निरीक्षक परीक्षेतल्या पेपरफुटीप्रकरणी MPSC च्या ३ अधिकाऱ्यांसह एकूण ६ जणांना अटक.**
3. **माओवादाची ओळख पुसून जिल्हा 'ग्रीन स्टील हब' म्हणून उदयास येत असल्याचे गडचिरोली स्थापना दिनी मुख्यमंत्री फडणवीस यांचे गौरवउद्गार.**
4. **ईद-ए-मिलाद-उन-नबीच्या सणाचा आज सर्वत्र उत्साह.**

---------------------------------------------

खेलो इंडिया डायलॉग

पंतप्रधान नरेंद्र मोदी राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त उद्या २७ तारखेला खेलो इंडिया डायलॉग ला दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून संबोधित करणार आहेत. देशाच्या क्रीडा यात्रेत युवकांचा सहभाग वाढवणं आणि युवकांच्या नेतृत्वातला विकसित भारत निर्माण करण्यासाठी त्यांचे विचार जाणून घेणं, हा या कार्यक्रमाचा उद्देश आहे. क्रीडा, शारीरिक तंदुरुस्ती, शिस्त, आरोग्यदायी जीवनशैली आणि राष्ट्र-निर्माणातील युवकांची भूमिका याबाबत पंतप्रधान या कार्यक्रमात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतील. मेरा युवा भारत अर्थात माय भारत द्वारे आयोजित या कार्यक्रमात देशातल्या प्रत्येक जिल्ह्यातल्या प्रत्येकी दोन महाविद्यालयातले युवक सहभागी होणार आहेत. अकोल्याच्या शंकरलाल खंडेलवाल महाविद्यालयात आयोजित करण्यात आला आहे. नागपूरातील लेडी अमृत बाई डागा - एलईडी महाविद्यालयात देखील या कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं आहे. यामध्ये विद्यार्थी, एनएसएस स्वयंसेवक, माय भारत चे युवा स्वयंसेवक आणि राष्ट्रीय स्तरावरील खेळाडू सहभागी होणार आहेत.

---------------------------------------------

पेपरफुटी अटक

मुंबई पोलिसांनी MPSC च्या औषध निरीक्षक परीक्षेतल्या पेपरफुटीप्रकरणी MPSC च्या ३ अधिकाऱ्यांसह एकूण ६ जणांना अटक केली आहे. अटक झालेल्यांमध्ये MPSC चे अवर सचिव आणि कक्ष अधिकारी यांचा समावेश असल्याचं वृत्त आहे. न्यायालयानं या सर्व आरोपींना बुधवारपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. याप्रकरणी MPSC च्या अध्यक्षांच्या राजीनाम्याची मागणी आमदार रोहित पवार यांनी केली आहे. अन्यथा मंगळवारपासून आंदोलन करायचा इशारा त्यांनी दिला.  हे मोठं रॅकेट असून याबाबतचा पोलिसांचा चौकशी अहवाल सार्वजनिक झाला पाहिजे त्यांनी केली.

---

भरती प्रक्रिया रद्द

तत्पूर्वी, महाराष्ट्र लोकसेवा आयोगानं अन्न आणि औषध प्रशासन विभागातल्या औषध निरीक्षक, गट-ब पदासाठी घेण्यात आलेली भरती प्रक्रिया रद्द करण्याचा निर्णय घेतला. २२ मार्च २०२६ रोजी झालेल्या चाळणी परीक्षेत गैरप्रकार झाल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्यानंतर आयोगाकडून प्राथमिक चौकशी करण्यात आली. परीक्षा सुरू होण्यापूर्वीच काही उमेदवारांना प्रश्नपत्रिका किंवा प्रश्न मिळाल्याचा आणि ते सोशल मीडिया किंवा इलेक्ट्रॉनिक माध्यमातून प्रसारित झाल्याचा दावा तक्रारींमध्ये करण्यात आला होता.

---

विजय वडेट्टीवार

अमरावती येथील जिल्हा स्त्री रुग्णालयातील नवजात अतिदक्षता विभागात लागलेल्या भीषण आगीत तीन नवजात बालकांचा मृत्यू झाला. या घटनेची आज काँग्रेस विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी रुग्णालयात प्रत्यक्ष पाहणी करून माहिती घेतली. रुग्णालयातील सुरक्षाव्यवस्थेतील गंभीर त्रुटी, कालबाह्य फायर सेफ्टी ऑडिट यामुळे सरकारच्या आरोग्य व्यवस्थेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे, असा आरोप वडेट्टीवार यांनी केला.

---

दहीहंडी रद्द

अमरावती जिल्हा स्त्री रुग्णालयातील दुर्घटनेच्या पार्श्वभूमीवर अमरावतीत भाजपने आयोजित केलेली दहीहंडी रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे. दहीहंडीवरील खर्च पीडित कुटुंबीयांना मदत म्हणून देण्यात येणार आहे. अमरावतीचे पालकमंत्री

चंद्रशेखर बावनकुळे यांनी या संवेदनशील निर्णयाचे स्वागत करत पीडित कुटुंबीयांच्या पाठीशी सर्वांनी उभं राहण्याचं आवाहन केलं.

--------------------------------------------

तीव्र रक्तक्षय

राज्यातील गरोदर महिलांमधील रक्तक्षयाची समस्या दूर करण्यासाठी सार्वजनिक आरोग्य विभागाने तीव्र रक्तक्षयावरील मोफत उपचारांना गती दिली आहे. भारतात सुमारे ५२ टक्के गर्भवती महिलांमध्ये रक्तक्षय आढळून येतो. तीव्र रक्तक्षय हे माता आणि नवजात शिशु मृत्यूचं एक महत्त्वाचं कारण आहे. त्यामुळे तीव्र रक्तक्षयावर राज्यातल्या शासकीय आरोग्य संस्थांमध्ये आयर्न सुक्रोज तसेच एफसीएम, म्हणजे फेरीक कार्बोक्सी माल्टोज या औषधांद्वारे शिरेवाटे उपचार सुविधा उपलब्ध करून दिली आहे. चालू वर्षात नोंद झालेल्या एकूण मातांपैकी, तपासणीअंती २३ हजार ५२४ गरोदर मातांचं निदान, तीव्र रक्तक्षय असलेल्या अतिजोखमीच्या माता म्हणून झालं आहे. त्यापैकी २१ हजार ३३७ मातांना हे उपचार दिले असून, उपचाराचं प्रमाण ९१ टक्क्यांवर पोहोचलं आहे. अहिल्यानगर, लातूर, बीड, चंद्रपूर, वर्धा, रत्नागिरी, वाशिम आणि बुलढाणा या जिल्ह्यांमधे हे प्रमाण १०० टक्के आहे. ग्रामीण आणि दुर्गम भागातील प्राथमिक आरोग्य केंद्रांपर्यंत ही सुविधा पोहोचविण्यावर भर देण्यात आला आहे.

--------------------------------------------

मुख्यमंत्री

सायबर गुन्हेगारांकडून पोलीस, सीबीआय किंवा न्यायाधीशांच्या नावाने नागरिकांना भीती दाखवून, घाबरवून फसवणूक केली जाते. त्यामुळे नागरिकांनी अशा कोणत्याही प्रकारांना बळी न पडता सायबर फसवणूक झाल्यास तातडीने ‘१९३०’ या सायबर हेल्पलाईन क्रमांकावर संपर्क साधावा, असं आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलं. सह्याद्री अतिथीगृह येथे महाराष्ट्र सायबरच्या वतीने आयोजित कार्यक्रमात फडणवीस यांच्या हस्ते ‘डिजिटल अरेस्ट’ या सायबर जनजागृती लघुपटाचं आणि ‘१९३० महाराष्ट्र सायबर अँथम’चं लोकार्पण करण्यात आलं, त्यावेळी ते बोलत होते.

--------------------------------------------

स्थापना दिन

गडचिरोली जिल्ह्याच्या ४४ व्या स्थापना दिनानिमित्त मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गडचिरोलीवासीयांना शुभेच्छा देत जिल्ह्याच्या विकासाचा गौरव केला.

माओवादाची जुनी ओळख पुसून गडचिरोली आता देशाचे 'ग्रीन स्टील हब' म्हणून उदयास येत असल्याचं त्यांनी म्हटलं. २०१४ पासून जिल्ह्याच्या विकासासाठी केलेल्या प्रयत्नांचे परिणाम दिसत असून कोट्यवधी रुपयांची गुंतवणूक येत असल्याचं फडणवीस म्हणाले . उद्योग, रोजगार, शिक्षण आणि पायाभूत सुविधांना प्राधान्य देतानाच जल, जमीन, जंगल आणि पर्यावरण संवर्धनाचा समतोल राखला जात असल्याचं त्यांनी स्पष्ट केलं. मेडिकल कॉलेज, विमानतळ, रेल्वेमार्ग, रस्ते आणि शैक्षणिक सुविधांच्या विस्तारामुळे जिल्ह्याच्या विकासाला नवी गती मिळत असल्याचेही त्यांनी नमूद केले. गडचिरोलीच्या परिवर्तनाचे श्रेय नागरिकांना देत विकासासाठी त्यांचे सहकार्य कायम राहावे, अशा अपेक्षा मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केल्या.

---

ईद-ए-मिलाद-उन-नबी

ईद-ए-मिलाद-उन-नबी आज साजरी होत आहे. यानिमित्त राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी देशवासीयांना शुभेच्छा दिल्या आहेत. पंतप्रधानांनी ईद-ए-मिलादच्या शुभेच्छा देताना, एकता आणि आनंद वृद्धिंगत होवो, तसंच समाजासाठी योगदान देण्याची प्रेरणा या दिवसातून मिळो, अशा शब्दात शुभेच्छा दिल्या. तर राज्यपालांनी, ईद-ए-मिलाद हा प्रेषित मोहम्मद यांच्या प्रेम, दया आणि त्यागाच्या शिकवणींचं स्मरण करून देणारा सण असल्याचं नमूद केलं. नागपुरात मरकजी सीरतुन्नबी कमिटीच्या नेतृत्वाखाली सेवासदन चौकातून निघालेल्या भव्य मिरवणुकीत शहरातील विविध भागांतील मुस्लिम बांधव सहभागी झाले. ढोल-ताशांच्या गजरात भाईचारा आणि  एकतेचा संदेश देणाऱ्या मिरवणुकीचे ठिकठिकाणी स्वागत करण्यात आले. यवतमाळमधील मुस्लिम बांधवांनी उत्साह आणि जल्लोषात ईद-ए-मिलाद-उन-नबी साजरी केली. पैगंबर मुहम्मद यांच्या जन्मदिनानिमित्त धार्मिक कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं.  मुस्लिम समाज संघटनांनी अनेक ठिकाणी वृक्षारोपण, रक्तदान शिबिरे आयोजित केली आणि गरजू लोकांना धान्याचं वाटपही करण्यात आलं. अकोल्यात देखील पारंपरिक जुलूस-ए-मोहम्मदी मिरवणूक उत्साहात काढण्यात आली. फतेह चौकातून सकाळी ११ वाजता सुरू झालेल्या या मिरवणुकीत सुमारे ३० हजार मुस्लिम बांधव सहभागी झाले.

---

नेटफ्लिक्स

इंडियन इन्स्टिट्युट ऑफ क्रिएटिव्ह टेक्नॉलॉजीमध्ये शिकणाऱ्या १०० विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्याचा निर्णय नेटफ्लिक्सनं घेतला आहे. या विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्कात ८० टक्क्यांपर्यंत मदत दिली जाणार आहे. १ वर्ष कालावधीचे २ पदविका अभ्यासक्रम आणि ६ महिने कालावधीच्या ४ प्रमाणपत्र अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना याचा लाभ मिळेल.

---------------------------------------------

एनपीएस

पेन्शन नियोजन आता केवळ सरकारी कर्मचाऱ्यांपुरते मर्यादित राहिलेले नाही. राष्ट्रीय पेन्शन प्रणाली (एनपीएस) नागरिकांना निवृत्ती नियोजन आणि दीर्घकालीन आर्थिक सुरक्षिततेसाठी सुलभ, लवचिक आणि शिस्तबद्ध पर्याय उपलब्ध करून देते. तसेच चक्रवाढीच्या परिणामामुळे दीर्घकालीन गुंतवणुकीत मोठी वाढ होऊ शकते, असं प्रतिपादन एमएसएमई विकास आणि सुविधा कार्यालय नागपूरचे संचालक डॉ. विजय सिरसाठ यांनी केलं. पेन्शन फंड नियामक आणि विकास प्राधिकरण यांच्या पुढाकारान, आज नागपुरातील रामदासपेठ येथील तरुण भारतच्या संस्कृती सभागृहात एनपीएस जनजागृतीकार्यशाळेचं आयोजन करण्यात आलं होतं, त्यावेळी ते बोलत होते.

---------------------------------------------

आश्रमशाळेला भेट

गडचिरोली जिल्हाधिकारी अविश्यांत पंडा यांनी अहेरी तालुक्यातील खमंचेरू शासकीय आश्रमशाळेला अचानक भेट देत वसतिगृह, वर्गखोल्या, स्वयंपाकगृह आणि परिसरातील सुविधांची पाहणी केली. विद्यार्थ्यांशी संवाद साधून त्यांच्या अडचणी जाणून घेताना वॉटर कुलर, अतिरिक्त खाटा आणि बेंचेसची मागणी त्यांनी नोंदवून घेतली. आवश्यक दुरुस्तीची कामे तातडीने हाती घेऊन सुविधा उपलब्ध करून देण्याचे निर्देश त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

---------------------------------------------

क्रिकेट

भारत आणि श्रीलंके दरम्यान सुरु असलेल्या दुसऱ्या कसोटी क्रिकेट सामन्याच्या आजच्या चौथ्या दिवशी श्रीलंकेचा पहिला डाव २९० धावांवर संपुष्टात आल्यानंतर त्यांना फॉलोऑन मिळाला. पहिल्या डावात भारताकडून प्रसिद्ध कृष्णा आणि मानव सुतारने प्रत्येकी तीन, सारांश जैननं दोन, तर मोहम्मद सिराज आणि रविंद्र जडेजाने प्रत्येकी एक गडी बाद केला. आज चौथ्या दिवसाचा खेळ संपला तेव्हा श्रीलंकेच्या ६

बाद २२९ धावा झाल्या आहेत. भारताने आपला डाव ५०३ धावांवर घोषित केला होता.

---------------------------------------------

हवामान

येत्या काही तासांत अमरावती आणि यवतमाळसह संपूर्ण विदर्भात तुरळक ठिकाणी हलक्या पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

---------------------------------------------